बहुराष्ट्रीय कंपन्यांविरुद्ध शेतकऱ्यांच्या बाजूने लढणार

'स्वदेशी जागरण मंच'ची घोषणा

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी): चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंच्या विरोधात संघटित होऊन त्यावर बहिष्कार घालणे, 'पेप्सिको'सारख्या कंपन्यांमुळे संकटात सापडणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहणे आणि अन्न सक्षमीकरणात (फूड फोर्टिफिकेशन) सर्वसामान्यांच्या आरोग्याचा विचार नसल्यामुळे त्याचा पुनर्विचार करणे, या तीन प्रमुख मुद्द्यांवर 'स्वदेशी जागरण मंच'च्या आगामी अखिल भारतीय राष्ट्रीय परिषदेत प्रामुख्याने विचार करून निर्णय घेण्यात येईल. येत्या दि. ८ व ९ जून, २०१९ रोजी पुणे येथे 'स्वदेशी जागरण मंच'च्या अखिल भारतीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती 'स्वदेशी जागरण मंच'चे अखिल भारतीय संघटक कश्मिरीलाल यांनी मंगळवारी येथे दिली. नव्या सरकारच्या स्थापनेनंतर वर उल्लेखित आव्हानांसंदर्भात सरकारसमवेत चर्चाही करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

''२०१४ साली नवीन सरकार सत्तेवर आल्यापासून चीनबरोबरील व्यापारतूट कमी होत आहे. चीनची अर्थव्यवस्था डळमळीत होत चालल्याचे दिसून येत आहे. चीनमधील अनेक कंपन्या बंद पडल्या आहेत. गेल्या वर्षी चीनच्या निर्यातदारांमध्येसुद्धा ४.४ टक्क्यांनी घट झाली होती. बऱ्याच देशांत आता चिनी वस्तूंवरील आयात शुल्क वाढविण्यात आले आहे. चीनचे अमेरिकेसमवेतचे व्यापारयुद्धदेखील भारताच्या बाजूने आणि चीनच्या विरोधात आहे. त्यामुळे समाज, व्यापारी आणि आगामी सरकार या सर्वांनी चिनी आयातीत वस्तूंच्याविरुद्ध संघटित होऊन त्यावर बहिष्कार घालावा. यासाठी 'स्वदेशी जागरण मंच'च्यावतीने जनजागरणाचे अनेक कार्यक्रमही योजण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

'पेप्सिको' या बहुराष्ट्रीय कंपनीने गुजरातमधील काही शेतकऱ्यांविरुद्ध न्यायालयात एक कोटींचा दावा ठोकला होता. आमचा कॉपीराइट असलेल्या काही खास प्रकारच्या बटाट्यांच्या वाणाचे शेतकऱ्यांनी उत्पादन केल्यावरुन 'पेप्सिको' ने तेथील शेतकऱ्यांवर खटला भरला होता. स्वदेशी जागरण मंच, शेतकरी संघटना, समाजमाध्यमे आणि राजकीय दबाव आल्यानंतर 'पेप्सिको'ने शेतकऱ्यांवर दाखल केलेला खटला विनाअट मागे घेतला. उदारीकरणाच्या धोरणानंतर देशातील शेती व्यवसायास म्हणजेच शेतकऱ्यांना अशाप्रकारच्या अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे. हे लक्षात घेऊन स्वदेशी जागरण मंचने शेतकऱ्यांच्या मागे ठामपणे उभे राहण्याचे ठरविले असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले की, ''मागील वर्षी महिला आणि बालविकास मंत्रालयाच्यावतीने अन्न सक्षमीकरणाबाबत (फूड फोर्टिफिकेशन) राष्ट्रीय चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, याबाबात घेण्यात आलेल्या निर्णयामुळे लाखो गरिबांच्या जीवनावर याचा वाईट परिणाम होऊ शकतो. तसेच अन्न सक्षमीकरणाकरिता (फूड फोर्टिफिकेश) वापरण्यात येणारे तंत्र आणि कच्च्या मालाच्या आयातीमुळे अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होत आहे.''

दरम्यान, 'स्वदेशी जागरण मंच'च्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यासंदर्भात पत्र लिहिण्यात आले असून, अन्न सक्षमीकरणाचा (फूड फोर्टिफिकेशन) विचार करताना केवळ अन्नपदार्थ निर्माण करणाऱ्या कंपन्यांचे हित जोपासण्यात आले आहे. मात्र, त्यात सर्वसामान्यांच्या आरोग्याचा विचार करण्यात आलेला नाही, असे त्यात नमूद करण्यात आले आहे. पंतप्रधान कार्यालयाने यासंदर्भात जातीने लक्ष घालून सर्व मुद्द्यांचा सखोल अभ्यास करावा. त्यासंदर्भात जे आक्षेप घेतले आहेत, त्याचे निराकरण होत नाही, तोपर्यंत कोणताही निर्णय घेऊ नये, अशी मागणीही 'स्वदेशी जागरण मंचने केली आहे, अशी माहितीही कश्मिरीलाल यांनी दिली.

पुणे: भारत सरकारने 'पद्मविभूषण' हा नागरी सन्मान प्रदान करून ज्येष्ठ इतिहास संशोधक, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचा नुकताच गौरव केला. त्याबद्दल खा. छत्रपती उदयनराजे भोसले यांनी बाबासाहेबांची त्यांच्या पर्वती येथील पुरंदरे वाड्यात नुकतीच सदिच्छा भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये दीर्घ चर्चा झाली. 'पद्मविभूषण पुरस्कार' मिळाल्याबद्दल उदयनराजे यांनी बाबासाहेबांचे अभिनंदनही केले.

तटरक्षक दलाने पकडली पाकिस्तानी बोट

५०० कोटींचे ड्रग्ज जप्त

नवी दिल्ली, दि.२१ (वृत्तसंस्था) : तस्करी विरोधी ऑपरेशनमध्ये भारतीय तटरक्षक दलाने मंगळवारी गुजरातच्या जाखाऊ किनाऱ्याजवळ अमली पदार्थाने भरलेली एक पाकिस्तानी बोट पकडली. 'अल मदिना' असे या बोटीचे नाव आहे. या बोटीमध्ये अमली पदार्थांची १९४ पाकिटे सापडली असून त्याची किंमत ५०० कोटी रुपयांच्या घरात आहे.

हे अमली पदार्थ जाखाऊच्या किनाऱ्यावर पोहोचवण्यासाठी पाकिस्तानी बोट आंतरराष्ट्रीय समुद्र सीमेजवळ थांबली होती. ही बोट पकडण्यासाठी भारतीय तटरक्षक दलाने एक जहाज आणि दोन वेगवान इंटरसेप्टर बोटी पाठवल्या. गुप्तचरांच्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली. समुद्र खवळलेला असतानाही तटरक्षक दलाच्या बोटींनी पाठलाग करून पाकिस्तानी बोट पकडली. यावेळी 'अल मदिना'वरून काही संशयास्पद बॅग्ज समुद्रात टाकण्यात आल्या. तटरक्षक दलाने पाकिस्तानी बोटीवरील सदस्यांना ताब्यात घेतले.

वेळासच्या किनाऱ्यावरील घटना

विणीचा हंगाम उलटल्यानंतर सापडले कासवाचे घरटे

घरट्यात आढळली १११ अंडी

अक्षय मांडवकर

मुंबई,दि.२१ : कोकण किनारपट्टीवर दरवर्षी होणारा सागरी कासवांचा विणीचा हंगाम संपुष्टात येऊन महिना उलटला आहे. असे असताना मंडणगड तालुक्यातील वेळासच्या किनाऱ्यावर सोमवारी सायंकाळी सागरी कासवाचे घरटे आढळून आले. गेल्या कित्येक वर्षांच्या नोंदीनुसार साधारणपणे एप्रिलच्या मध्यापर्यंत कासवांची घरटी होतात. परंतु, सोमवारी आढळलेल्या या घरट्यामुळे राज्यातील कासव संवर्धनाच्या कामामध्ये नवी नोंद झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारची ही दुसरी नोंद असून यापूर्वी जून महिन्यातही कासवाचे घरटे आढळले होते.

२००३ पासून राज्याच्या कोकण किनारपट्टीवर सागरी कासव संवर्धनाचे काम सुरू आहे. राज्याच्या सागरी परिक्षेत्रात 'ऑलिव्ह रिडले' प्रजातीची सागरी कासवे मोठ्या संख्येने आढळतात. दरवर्षी या प्रजातीच्या माद्या रत्नागिरी जिल्ह्यातील १२ आणि सिंधुदुर्गातील सहा किनाऱ्यांवर अंडी घालण्यासाठी येतात. सागरी कासवांचा विणीचा हंगाम हा प्रामुख्याने डिसेंबर ते मार्च या चार महिन्यांचा असतो. या कालावधीत मादी किनाऱ्यावर येऊन अंडी घालतात. काही वेळा एप्रिल महिन्यातही घरटी झाल्याची नोंद आहे. मात्र, आता विणीचा हंगाम संपून महिना उलटल्यानंतर ही मादी कासवाचे घरटे आढळल्याची नोंद झाली आहे. समुद्री कासव संवर्धनासाठी प्रसिद्ध झालेल्या वेळासच्या किनाऱ्यावर सोमवारी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास कासवाचे घरटे सापडले. विशेष म्हणजे, ठाण्याहून पर्यटनासाठी आलेल्या शिरीन वैद्य, सोहम भिडे आणि श्रेयस जोशी या पर्यटकांना किनाऱ्यावर अंडी घालण्यासाठी आलेली मादी दिसली.

पर्यटकांनी दिलेल्या माहितीच्या आधारे आम्ही किनाऱ्यावर जाऊन पाहणी केली असता, त्याठिकाणी १११ अंडी आढळून आल्याची माहिती वेळासच्या कासव संवर्धन मोहिमेचे कार्यकर्ते विरेन्द्र पाटील यांनी दिली. सध्या पौर्णिमेनंतरची मोठी भरती सुरू असल्याने अंडी सुरक्षित राहावी म्हणून हॅचरीमध्ये कृत्रिम घरटे बांधून त्यामध्ये त्यांना हलविल्याची माहिती त्यांनी दिली. शिवाय सकाळी उष्णता अधिक असल्याने कृत्रिम घरट्याचे तापमान स्थिर राहावे म्हणून हॅचरीवरून हिरव्या रंगाची जाळी लावल्याचे त्यांनी सांगितले. यंदा वेळासच्या किनाऱ्यावर सागरी कासवांची २० घरटी आढळून आली होती. त्यातून बाहेर आलेल्या

पिल्लांना सोडण्याचे काम १५ मेपर्यंत पूर्ण करण्यात आले. मात्र आता पुन्हा घरटे आढळून आल्याने पावसाळ्यात पाण्यापासून घरटे सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी वेळासच्या कार्यकर्त्यांवर आहे.

तज्ज्ञांच्या मते, विणीचा हंगाम संपुष्टात आल्यानंतर घरटे झाल्याची ही दुसरी नोंद आहे. यापूर्वी पावसाळ्याच्या तोंडावर जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घरटे झाल्याची नोंद असल्याची माहिती राज्याच्या सागरी कासव संवर्धन मोहिमेचे प्रणेते भाऊ काटदरे यांनी दिली. कासव संवर्धनाची मोहीम सुरू करताना केलेल्या सर्वेक्षणात काही जुन्या लोकांनी पावसाळ्यातही कासवाची पिल्ले दिसल्याचा दावा केला होता. मात्र, गेल्या १८ वर्षांतील कामादरम्यान आजवर कधीही पावसाळ्यात घरटी झाल्याची नोंद झाली नसल्याचे भाऊंनी सांगितले, तर सोमवारी सापडलेल्या 'अंड्यांमधील पिल्लांचा जन्मदर कमी असण्याची शक्यता' या विषयावर पी.एचडी करणाऱ्या सुमेधा कोरगांवकर यांनी वर्तविली आहे. सभोवतालचे तापमान वाढल्यावर पिल्लांचा मृत्यूदर हा शक्यतो वाढतो. साधारणपणे तापमान वाढल्यानंतर घरट्यामधील वाळूत आर्द्रता वाढते. महाराष्ट्रातील किनारे हे खाडीक्षेत्राजवळ असल्याने तेथील वाळूमध्ये आर्द्रता निर्माण होण्याचे प्रमाण जास्त आहे. परिणामी घरट्यामधील वाळू कडक होते आणि त्यामध्ये पिल्ले अडकल्याने त्यांचा मृत्यू होत असल्याचे निरीक्षण कोरगांवकर यांनी नोंदवले आहे. त्यामुळे सोमवारी सापडलेल्या घरट्याची विशेष काळजी घ्यावी लागणार असल्याचे, त्या म्हणाल्या.

कासव विणीची प्रक्रिया

किनाऱ्यावर वाळूत खड्डा तयार करून त्यामध्ये मादी आपली अंडी घालते. एक मादी कासव १०० ते १५० अंडी घालते. भरतीच्या पाण्यापासून अंडी सुरक्षित राहावी म्हणून हॅचरी बांधली जाते. हॅचरीमध्ये कृत्रिम घरटे तयार करून त्यामध्ये अंडी हलविली जातात. ४५ ते ५५ दिवसांमध्ये अंडी उबवून त्यामधून पिल्ले बाहेर पडतात.

विहिरीत बुडून बिबट्याचा मृत्यू

पुणे, दि. २१ (प्रतिनिधी): बिबट्यांचा तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जुन्नरमध्ये मंगळवारी एका नर बिबट्याचा विहिरीत बुडून मृत्यू झाला. धोलवड गावातील एका उसाच्या शेतातील विहिरीत हा बिबट्या पडला होता. अशक्तपणा आणि जखमी असल्याने अखेरीस या बिबट्याचा बुडून मृत्यू झाल्याचे वन विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

उसाच्या शेतात वास्तव्य करून माणसांसोबत सहजीवन करणाऱ्या बिबट्यांसाठी जुन्नर तालुका प्रसिद्ध आहे. या ठिकाणी महिन्यातून तीन ते चार वेळा बिबट्या बचावाच्या घटना घडत असतात. यामध्ये बिबट्या विहिरीत पडण्याच्या घटनांचे प्रमाण सर्वाधिक आहे. अशाच प्रकारची बिबट्या विहिरीत पडल्याची घटना सोमवारी मध्यरात्री घडली. मात्र, दुर्दैवाने या बिबट्याचा विहिरीत बुडून मृत्यू झाला. मंगळवारी दुपारी बिबट्याचे पाण्यावर तरंगणारे मृत शरीर वन विभागाने विहिरीबाहेर काढले. धोलवड गावातील शंकर नलावडे यांच्या उसाच्या शेतातील विहिरीत हा बिबट्या पडला होता. दुसऱ्या बिबट्यासोबत हद्दीसाठी झालेल्या झटापटीत या बिबट्याला जखमा झाल्याची माहिती माणिकडोह बिबट्या निवारा केंद्राचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अजय देशमुख यांनी दिली. हा बिबट्या नर असून अंदाजे पाच ते सहा वर्षांचा आहे. झटापटीत तो विहिरीत पडल्याची शक्यता असून रात्रभर तो विहिरीत पोहत असल्याने अशक्त झाला. अखेरीस बुडून त्याचा मृत्यू झाल्याचे देशमुख यांनी सांगितले.

दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त मुख्यमंत्र्यांनी दिली प्रतिज्ञा

मुंबई : दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रतिज्ञा दिली. तसेच माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मुख्यमंत्र्यांनी त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी मुख्य सचिव अजोय मेहता, अतिरिक्त मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव भूषण गगराणी, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी नंदकुमार उपस्थित होते.

माध्यम शिक्षण संस्था देणार 'सोशल मीडिया मार्केटिंग'धडे

मुंबई,दि.२१ (प्रतिनिधी): 'माध्यम शिक्षण संस्थेतर्फे 'सोशल मीडिया मार्केटिंग' हा कोर्स सुरू केला गेला आहे. बहुतांशी महिला उद्योजिका घरातून छोटे व्यवसाय करतात. हा व्यवसाय जर ऑनलाईन केला तर हे छोटे व्यवसाय मोठ्या स्वरुपात विकसित होऊ शकतात. हाच विचार घेऊन माध्यम शिक्षणतज्ज्ञ मंगेश करंदीकर यांनी हा कोर्स सुरू केला आहे. महिलांना त्यांची उत्पादने ऑनलाईन कशी पोहोचवता येतील, भावी ग्राहकांपर्यंत पोहोचणे, ग्राहकांना आपल्या उत्पादनांकडे आकर्षित करणे, हे सर्व या कोर्समध्ये शिकवले जाईल. त्याचप्रमाणे कोणते उद्योग करता येतील, याबद्दलही मार्गदर्शन दिले जाईल. कोर्स संपल्यानंतर तुम्ही तुमचा उद्योग कशा पद्धतीने वाढू शकाल, यामध्ये प्रामुख्याने फेसबुक आणि इन्स्टाग्राम या दोन्ही सोशल मीडिया माध्यमांवर विनामूल्य व सशुल्क या दोन्ही प्रकारचे मार्केटिंग कसे करावे हेदेखील शिकवले जाईल. कोर्स संपल्यानंतरहीदेखील दहा दिवस महिलांचा व्यवसाय ऑनलाईन नेण्यास विनामूल्य मदत करण्यास येईल. अधिक माहितीसाठी mangesh.karandikar@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा.

भगेरिया इंडस्ट्रीज लि.
(CIN: L40300MH1989PLC052574)
नोंद. कार्यालय: १००२, १० वा मजला, टोपीवाला सेंटर, ऑफ एस. व्ही. रोड, गोरेगाव (पू), मुंबई ४०० ०६२.

सूचना

सेबी (सूची दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियम ४७ सह वाचावयाच्या निय २९ अन्वये, याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक, इतर गोष्टींसोबतच, दि. ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या त्रैमासिक/वर्षाकरिता कंपनीचे लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्याकरिता आणि मंजूर करण्याकरिता आणि वित्तीय वर्ष २०१८-१९ करिता कंपनीच्या सम भागांवर, जर असल्यास, लाभांशाचा विचार करण्याकरिता आणि शिफारस करण्याकरिता आणि बोनस भाग पारित करण्याच्या प्रस्तावावर विचार करण्याकरिता बुधवार, दि. २९ मे, २०१९ रोजी घेण्यात येणार आहे.
ही सूचना कंपनीची वेबसाईट www.bhageriagroup.com, बीएसई वेबसाईट www.bseindia.com आणि एनएसई वेबसाईट www.nseindia.com येथे देखील उपलब्ध आहे.

भगेरिया इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/-
केतन गौर
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : २१.०५.२०१९

केनरा बैंक Canara Bank
(भारत सरकार अंगिकृत)
कॅनरा बँक, शिवडी शाखा
१ ला मजला, राजीव औद्योगिक वसाहत, युनिट क्र. ९/१०, गोलांजी हिल रोड, शिवडी पश्चिम, मुंबई - १५. **दूरध्वनी :** ०२२-२४१३ ०७३५, २४१३ ४४९२,
ईमेल : cb0122@canarabank.com

ताबा सूचना [कलम १३(४)]
(स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी: निम्नस्वाक्षरीकार यांनी **कॅनरा बँकेचे** प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा कायदा ५४) (यानंतर "सदर कायदा" म्हणून उल्लेखित) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून दि. ०७.०१.२०१९ रोजी पारित केलेल्या मागणी सूचनेद्वारे कर्जदार **श्री./सौ./मे. उत्तम रघु जाधव** यांना सदर सूचनेमध्ये नमूद रक्कम **रु. २,७६,२०६/- (रुपये दोन लाख शहात्तर हजार दोनशे सहा मात्र)** सदर सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत प्रदान करण्यास सांगण्यात आले.

सदर रक्कम भरपाई करण्यास कर्जदार अयशस्वी ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी याखाली नमूद केलेल्या मालमत्तेचा सदर नियमाच्या नियम ८ आणि ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून **१६ मे, २०१९** रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार / हमीदार आणि सर्वसाधारण जनता यांना याद्वारे सूचित करण्यात येते की सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार हा **कॅनरा बँके**च्या रक्कम **रु. २,६४,८३५/-** आणि त्यावरील व्याज एवढ्या रकमेच्या प्रभारास अधीन असेल.

गहाण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध असलेल्या वेळेच्या बाबतीत सदर कायद्याच्या कलम १३ (८) च्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

स्थावर मालमत्तेचा तपशील

सदनिका क्र. ०३, तळ मजला, ए विंग, मंगेशी पार्क गाव, उंबर्डे गाव, तालुका कल्याण, जि. ठाणे - ४१२३०१ समाविष्ट असलेल्या मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे. **सीमाबद्धता : उत्तरेस:** सदनिका क्र. २, ए-विंग, **दक्षिणेस:** सदनिका क्र. ६ आणि ५, **पूर्वेस:** प्रवेशद्वार, **पश्चिमेस :** बंद भिंत.

सही/-
दिनांक : १६.०५.२०१९ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : मुंबई **कॅनरा बँक**

डबेवाल्यांना शाळांमध्ये डबे देण्यास परवानगी देण्याबाबत

पोलीस आयुक्त आणि शिक्षण उपसंचालकांनी संयुक्त बैठक घ्यावी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी): मुंबईतील डबेवाल्यांना शाळांमध्ये सुरक्षेच्या कारणास्तव प्रवेश देण्यास शाळांनी बंदी घातली असली तरी, डबेवाल्यांची आजपर्यंतची प्रामाणिक सेवा लक्षात घेता ही बंदी अयोग्य आहे. मुंबई भाजप अध्यक्ष आ. ॲड. आशिष शेलार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे याप्रश्नी लक्ष वेधले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलीस आयुक्तांनी तातडीने याबाबत संयुक्त बैठक घ्यावी असे निर्देश दिले आहेत. तसेच शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनीही याबाबत तातडीने लक्ष घालण्यातचे निर्देश शिक्षण उपसंचालकांना दिले आहेत.

विद्यार्थ्यांना आरोग्यदायी अन्नपदार्थ खाण्यापासून वंचित ठेवले जात आहे. विद्यार्थ्यांना डबे पुरवण्यास शाळांनी मनाई केली आहे, असा आरोप मुंबई डबेवाले संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केला आहे. त्याची तातडीने दखल घेत मुंबई भाजप अध्यक्ष आ. ॲड. आशिष शेलार यांनी मंगळवारी मुख्यखमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांना भेटून व पत्र लिहून त्यांचे याविषयी लक्ष वेधले. १९८० पासून मुंबईतील डबेवाले सुमारे रोज दोन लाख लोकांना डबे पोहोचविण्यावचे काम मेहनतीने करीत असतात. त्यामुळे त्यांना शाळेत डबे देण्यास बंदी घालणे ही बाब अन्यायकारक आहे. शाळांनी मुलांच्या सुरक्षेची काळजी जरूर घ्यावी. मात्र, शाळांमध्ये अन्य सेवा देणाऱ्यांना ज्या पद्धतीने परवानगी देण्यात येते, त्याच पद्धतीने डबेवाल्यांची सेवाही सुरू करण्यात यावी, अशी मागणी करीत आ. ॲड. आशिष शेलार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांना मंगळवारी प्रत्यक्ष भेटून तसेच पत्र लिहून ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. दरम्यान, मुंबई पोलीस आयुक्तांनी तातडीने शाळा, डबेवाले यांच्याशी संयुक्त बैठक घेऊन यावर तोडगा काढावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनीही शिक्षण उपसंचालकांनी याबाबत तातडीने लक्ष घालावे तसेच ही सेवा सुरू राहील याकडे लक्ष द्यावे, असे निर्देश दिले आहेत.

राज्यात निवडणूक मतमोजणीची तयारी पूर्ण

मुंबई: लोकसभा निवडणुकीची मतमोजणी गुरुवार, २३ मे रोजी होणार असून राज्यात मतमोजणीची तयारी पूर्ण झाली आहे. जनतेला निकालाची माहिती जलदगतीने मिळण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. राज्यातील ४८ लोकसभेच्या जागांसाठी २३ मे रोजी फेरी पद्धतीने निकाल जाहीर करण्यात येणार आहेत. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील पाच व्हीव्हीपॅट यंत्रांमधील पावत्यांची पडताळणी करण्यात येणार आहे. जनतेला मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा निकाल पाहण्यास मिळणार आहे. तसेच १९५० या टोल फ्री क्रमांकावर आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षातील ०२२-२२०४०४५१ / ५४ या क्रमांकावरदेखील निवडणूक निकालाची अद्ययावत माहिती मिळणार आहे.

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that, under instruction of my client Mr. Mukesh Manharlal Mehta and Mrs. Smita Mukesh Mehta who are owners of flat bearing No. 11, 2nd floor and members of "Neelkanth Smruti", situated at Plot No. 31, Neelkanth Smruti Co-op Housing Society Limited, Rifle Range, Jagdusha Nagar, Ghatkopar (West), Mumbai – 400 086, I hereby state that, the Original Agreement dated 13th June 1979 executed between M/s. Nanji Devji Patel & Co. (Builder) and Shri. Bhasker K. Upadhyaya (The Erstwhile Owner) for the above mentioned property, has been lost/misplaced. Accordingly, my client Mr. Mukesh Manharlal Mehta, has lodged a complaint at Ghatkopar Police Station, on 24.12.2018 vide Register No. 6230/2018 for the lost/misplaced of the Original Agreement.

Any person, Bank or Institution claiming interest in the said property or any part thereof by way of sale, gift, lease, mortgage, lien, trust, easement or otherwise howsoever are hereby required to claim personally or by written claim at office address given below within a period of 14 days from the date of this notice, failing which such claim, if any shall be considered as waived / void.

Place : Mumbai
Dated : 22/05/2019

Sd/-
Viral J. Bhanushali
Advocate
Shop No B/4, Ambika Siddhi CHS Ltd., Near Madhav Baug Hall, Jagdusha Nagar, Ghatkopar (West), Mumbai - 400 086

'मसाला किंग' डॉ. धनंजय व वंदना दातार दाम्पत्य 'आंतरराष्ट्रीय महाब्रॅण्ड पुरस्कारा'ने सन्मानित

मुंबई, दि २१ (प्रतिनिधी): 'मसाला किंग' डॉ. धनंजय व वंदना दातार दाम्पत्याला 'आंतरराष्ट्रीय महाब्रॅण्ड पुरस्कारा'ने नुकतेच सन्मानित करण्यात आले. बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमध्ये बीएसईचे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ आशिषकुमार चव्हाण यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

डॉ. दातार यांनी 'मसाला किंग' बनण्याच्या आपल्या प्रवासाविषयी यावेळी अनुभव कथन केले.

डॉ. धनंजय दातार यांनी ब्रॅण्डिंगचे महत्त्व आणि आजच्या जगामध्ये ब्रॅण्ड तयार करणे आवश्यक असल्याचे म्हटले. त्यांनी आपल्या मुलाचे उदाहरण देऊन सांगितले की, आजची तरुण पिढी ब्रॅण्डेड उत्पादनांची खरेदी कशी करायची ते पाहू लागली आहे. एखाद्याने आमच्या उत्पादनांमध्ये आणि सेवांमध्ये मूल्य तयार केले पाहिजे आणि मोठा ब्रॅण्ड बनविण्यासाठी चांगले सादरीकरण असावे.

उद्योजकांनी केवळ पैशांची कमाई केली पाहिजे, असे नाही तर त्यांनी त्यांच्या चांगल्या जीवनासाठी प्रत्येक क्षणाचा आनंद घेणेही आवश्यक आहे, असे ते म्हणाले. यावेळी डॉ दातार यांनी अमित बागवे आणि रचना बागवे यांचे आभार मानले. यावेळी त्यांनी त्यांच्या जीवनसाथी आणि व्यावसायिक भागीदार वंदना यांचेदेखील आभार मानले. यावेळी बीएसईचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ अमित बागवे आणि रचना लचके-बागवे, तुषार भगत, महेश कारंडे, शंकर जाधव, बाळासाहेब कांबळे उपस्थित होते.